राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी तसेच उर्वरीत ठिकाणीच्या शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये २री पाळी ऑगस्ट २०१० पासून सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,

शासन निर्णय क्रमांक : आयटीआय २००९/प्र.क्र.(१३८/०९)/व्यशि-३

दिनांक : १ जुन, २०१०

संदर्भ :-१) प्र.संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई -०१ यांचे पत्र क्रमांक २०/सीटीएस/२१९,२६१,३८८,दिनांक २६/०५/२००९, २०/०६/२००९ व १०/०९/२००९ ची पत्रे.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.आयटीआय-२००९/(१४/०९)/व्यशि-३, दिनांक २६/०६/२००९.

**प्रस्तावना :-**

राज्याच्या औद्योगिकरणात झपाटयाने वाढ होत आहे, त्याअनुषंगाने आधुनिक तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेल्या कुशल मनुष्यबळाची गरज लघु, मध्यम व मोठ्या उद्योजकांना निर्माण झाली आहे. व्यवसाय प्रशिक्षणाद्वारे निर्माण केले जाणारे कुशल मनुष्यबळ सद्यःस्थितीत कमी पडत आहे, त्यामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील व्यवसाय प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ होणे आवश्यक आहे. राज्यातील विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या उपलब्ध यंत्रसामुग्रीचा महत्तम वापर करुन, प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय अभ्यासक्रमाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त पार्श्वभूमीवर संबंधित क्षेत्रातील उद्योगधंद्यांची मागणी लक्षात घेऊन राज्यातील जिल्हास्तरीय शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी सुरु करणे आणि तालुकास्तरीय शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरु करण्याच्या प्रस्तावास संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयानुसार विभागीय स्तरावर तत्वत: मान्यता देण्यांत आली आहे. सदरच्या प्रस्तावा अंतर्गत जिल्हास्तरीय शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये १२६३ इतक्या तुकडया व तालुकास्तरीय शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये ७२९ तुकडया याप्रमाणे एकूण २१९२ तुकडया सुरु करण्याचे प्रस्तावित होते. या प्रस्तावाच्या अनुषंगाने मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यांत आला असता **मंत्रीमंडळाने या संदर्भात दिनांक ०७/०४/२०१० रोजीच्या मंत्रीमडळ बैठकीत खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.**

१) महानगरपालिका क्षेत्रामध्ये असणा-या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी व तिसरी पाळी सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यांत आली.

२) उर्वरीत ठिकाणी असणा-या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुसरी पाळी सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यांत आली.

३) उपरोक्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अभ्यासक्रम सुरु करताना त्या क्षेत्रातील उद्योगधंद्यांची मागणी व व्यवसायभिमुखता लक्षात घेऊन ज्या अभ्यासक्रमांना अधिकची मागणी आहे, असे व्यवसाय सुरु करण्यांत यावेत. तसेच जिल्हानिहाय प्रवेश अर्ज व प्रवेशासाठीच्या जागा यांचाही विचार करावा. मागणी नसलेले व्यवसाय बंद करण्याची शक्यताही विभागाने तपासावी.

४) उपरोक्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दुस-या व तिस-या पाळीत सुरु करावयाच्या व्यवसाय अभ्यासक्रमासाठी लागणारी शिक्षकीय पदे एन.सी.व्ही.टी.च्या निकषाप्रमाणे निर्माण करुन कंत्राटी तत्वावर भरण्यास मान्यता देण्यांत आली. मात्र ती भरतांना शैक्षणिक अर्हता, निवडीची पध्दती, इ. सर्व निकषांचे पालन करावे. तसेच अतिरिक्त कार्यभार / मानधन देऊन कांही गरज भागविण्याचाही विभागाने प्रयत्न करावा.

५) वरील प्रयोजनासाठी आवश्यक पदांचा तपशिल सचिव समितीने एक महिन्यात ठरवावा.

**उपरोक्त मंत्रीमंडळाचा निर्णय लक्षात घेऊन संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.** तसेच मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार महापालिका क्षेत्रातील कार्यरत असलेल्या शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये उद्योगक्षेत्राच्या गरजेनुसार व अभ्यासक्रमाच्या मागणीनुसार व्यवसाय अभ्यासक्रमाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी दुसरी व तिसरी पाळी सुरु करणे व उर्वरित औ.प्र.संस्थांमध्ये आवश्यकतेनुसार दुसरी पाळी सुरु करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदरच्या प्रस्तावासाठी आवश्यक पदे व खर्चाचा तपशील मंत्रीमंडळाच्या क्रमांक ३ व ४ येथील निर्णय लक्षात घेऊन संचालनालयाने तात्काळ शासनास सादर करावा. तदनंतर पदनिर्मितीस वित्त विभागाची मान्यता घेऊन निधी अर्थसंकल्पित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

सदरचा शासन निर्णय हे महाराष्ट्राच्या वेबसाईटवर 201006021517020001 दर्शविण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(सं.अ.बागेश्वर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. प्र.संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१
२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/नाशिक/पुणे/अमरावती/औरंगाबाद/नागपूर (व्यवसाय शिक्षण संचालनालयामार्फत)
३. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे (पु), मुंबई -५१
४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, (व्यवसाय प्रशिक्षण संचालनालयामार्फत)
५. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (प्रशिक्षण संचालानालयामार्फत)
६. नियोजन विभाग.
७. वित्त विभाग
८. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (व्यशि कार्यासने)
९. निवड नस्ती (व्यशि-२)

D:\S.A.BAGESHWAR\GR\2nd & 3rd Ship in ITI.doc